दै. गोदातीर दि. 13.10.25

# ४८ लाखांचा मुद्देमाल जप्त, चौघांविरोधात गुन्हा दाखल

## नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** - गोदावरी नदीपात्रातील अवैध वाळू उत्खननावर आळा घालण्यासाठी नांदेड ग्रामीण पोलिसांनी सोमवारी (दि.१०) मध्यरात्री केलेल्या कारवाईत तब्बल ४८ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गोदावरी नदीकाठावरील असर्जन विष्णुपुरी प्रकल्पाजवळ ही कारवाई करण्यात आली असून, चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस पथकाला गोदावरी नदीच्या असर्जन, विष्णुपुरी धरण परिसरात एमएच २६-३१३२ क्रमांकाचा हायवा ट्रक १० नोव्हेंबरच्या मध्यरात्री दिसला. त्याची तपासणी केली असता त्यात पाच ब्रास वाळू आढळून आली. तसेच वाळू उपसण्यासाठी वापरले जाणारे पाच तराफे आणि दोन इंजिनही पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणात ट्रक चालक अण्णाराव ढवळे, विनोद वाहनमालक अविनाश देशमुख यांच्यासह आणखी दोन जणांविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या सर्व साहित्याची एकूण किंमत ४८ लाख ७५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान ग्रामिण पोलिस ठाण्यातंर्गत यापुर्वीही अवैध वाळू तस्करी रोखण्यासाठी कारवाया आहेत. या कारवाईत पोलीस अंमलदार गजेंद्र सिरमलवार यांच्या फिर्यादीवरून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे आणि पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजयकुमार कांबळे, अंमलदार शेख इब्राहिम, अर्जुन मुंडे, शेख जमीर, शेख आसिफ आणि धम्मपाल कांबळे यांच्या पथकाने सहभाग घेतला.